# मुंबई विद्यापीठ

निवडणूक विभाग

## परिपत्रक

क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२३-२४/७९.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम २८(२)(ण)[28(2)(o)] अन्वये संलग्न, संचालित व स्वायत्त महाविद्यालयांचे १० प्राचार्य/संचालक, कलम २८(२)(द)[28(2)(r)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थेतील १० अध्यापक व कलम २८(२)(ध)[28(2)(s)] अन्वये ०३ विद्यापीठ अध्यापक अधिसभेवर व कलम ३२(३)(छ)[32(3)(g)] नुसार ०८ अध्यापक (प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे ०२ अध्यापक) विद्यापरिषदेवर आणि कलम ४०(२)(ग)[40(2)(c)] अन्वये महाविद्यालयातील/परिसंस्थातील ०३ विभाग प्रमुख अभ्यासमंडळावर निवडून देण्याकरीताच्या अंतिम मतदार याद्या दिनांक २० मे, २०२३ रोजी विद्यापीठ परिपत्रक क्र.नि.वि. /आयसीडी/२०२३-२४/३९, दि. १९ मे, २०२३ अन्वये प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. तसेच या सर्व मतदार संघांकरीता नामनिर्देशन भरण्याबाबतच्या अधिसुचना दिनांक २९ मे, २०२३ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

उपरोक्त अधिसुचनेनुसार ऑनलाईन पद्धतीने एका अर्जदाराला एकदाच नामनिर्देशन अर्ज भरता येतो. जर एका अर्जदाराला एकापेक्षा अधिक प्रवर्गामध्ये नामनिर्देशन अर्ज भरावयाचे असल्यास Election portal च्या www.mu.eduapp.co.in या website वर जावून forms या Tab वर click करून आपल्याला हव्या असलेल्या अर्जाची Printout काढावी व सदर अर्ज ऑफलाइन पद्धतीने भरून शुल्क रू. ५००/- कक्ष क्रमांक १३, रोख विभाग, वित्त व लेखा विभाग, तळ मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे जमा करावी. तद्नंतर शुल्क भरल्याची पावतीसह अर्ज **बुधवार, दिनांक ०७ जून, २०२३ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत रूम नं. ११०, निवडणूक विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०० ०३२, येथे आवश्यक त्या कागदपत्रांसह** जमा करावेत.

कृपया सर्व संबंधीतांनी याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-

(प्रा. सुनिल भिरूड)

प्रभारी कुलसचिव तथा

निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : ०५ जून, २०२३.

ठिकाण : मुंबई- ४०० ०३२.